रे.मु.नं.३९/२०१७
त्र्यंबक वि. सिताराम

**आदेश नि.क्र.१९**

सदर अर्ज वादीतर्फे मयत वादीचे वारस दाव्यात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज, म्हणणे, व कादपत्राचे अवलोकन केले.

३. वादीचे थोडक्यात कथन असे की, सदर दाव्यातील वादी हे दि.१८.१२.२०१८ रोजी मयत झाले आहेत. सदर दावा हा करारपुर्तीचा असल्यामुळे व दाव्याचे कारण वादीचे मृत्युनंतर शिल्लक राहत असल्याने दाव्याकामी वादीचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

४. समोरील बाजूचे थोडक्यात कथन असे की, सदर अर्ज खोटा व लबाडीचा आहे. सोबत मृत्युदाखला दाखल केलेला नाही, शेवटी अर्ज रद्द करणेची विनंती केली.

५. अर्जासोबत शपथपत्र दिलेले आहे व आज रोजी मृत्युप्रमाणपत्र देखील दाखल केले आहे. अर्ज मुदतीत आहे. दाव्याचे कारण शिल्लक राहते. अर्जात नमुद व्यक्ति हेच मयत वादीचे वारस दिसुन येतात, करिता खालील आदेश:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादपत्रात दुरूस्ती पुढील तारीख अथवा त्यापुर्वी करण्यात येवून दुरूस्त दाव्याच्या आवश्यकतेनुसार प्रती दाखल कराव्यात.

सही/—
दि. १२/१२/२०१९ (श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव.